दि. ०५.११.२०२४

# प्रसिध्दीपत्रक
# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार महाराष्ट्रामधील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघासाठी एका टप्प्यांमध्ये दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे राज्यातील लोकसभेच्या १६ - नांदेड या एका लोकसभा मतदारसंघात सुद्धा दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहें.

**१.विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवारांच्या नामनिर्देशनाबाबत माहिती –**

राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ साठी नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक २९.१०.२०२४ असा होता. त्यानुसार २८८ विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ७,०७८ इतके नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. त्यापैकी एकूण २,९३८ अर्ज मागे घेण्यात आले असून अंतिम उमेदवारांची संख्या ४,१४० इतकी आहे. याबाबतचा विभाग निहाय तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

**२. मतदारांची संख्या :-**

अ) सन २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीसाठी असलेले मतदार व सद्यस्थितीत अद्यावयत मतदार यादीप्रमाणे असलेले मतदार यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | तपशील | सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीचे मतदार | दि.३० ऑगस्ट, २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम मतदार यादीतील मतदार | दि.३०.१०.२०२४ रोजी अद्यावत मतदारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | ४,६७,३७,८४१ | ४,९३,३३,९९६ | ५,००,२२,७३९ |
| २ | महिला | ४,२७,०५,७७७ | ४,६०,३४,३६२ | ४,६९,९६,२७९ |
| ३ | तृतीयपंथी | २,५९३ | ५,९४४ | ६,१०१ |
| | एकूण | ८,९४,४६,२११ | ९,५३,७४,३०२ | ९,७०,२५,११९ |

**ब) दिनांक ३०.१०.२०२४ रोजीची दिव्यांग (PwD Voters) मतदारांची संख्या :-**

| **अ.क्र.** | **मतदारांचा प्रवर्ग** | **एकूण संख्या** |
|---|---|---|
| १ | पुरुष | ३,८४,०६९ |
| २ | महिला | २,५७,३१७ |
| ३ | तृतीयपंथी | ३९ |
| | एकूण | ६,४१,४२५ |

क) दिनांक ३०.१०.२०२४ रोजीची सेना दलातील (Service Voters) मतदारांची संख्या :-

| अ.क्र. | मतदारांचा प्रवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १. | पुरुष | १,१२,३१८ |
| २. | महिला | ३,८५२ |
| ३. | तृतीयपंथी | -- |
| ४. | एकूण | १,१६,१७० |

ड) वयोगटानुसार मतदार संख्या :-

| **अ.क्र** | **वयोगट** | **पुरुष** | **महिला** | **तृतीयपंथी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ - १९ | १२,९१,८४७ | ९,३०,७०४ | १५३ | २२,२२,७०४ |
| २ | २० - २९ | १,०१,६२,४१२ | ८६,८०,१९९ | २,३९४ | १,८८,४५,००५ |
| ३ | ३०-३९ | १,११,२१,५७७ | १,०६,९१,५८२ | २,११९ | २,१८,१५,२७८ |
| ४ | ४०-४९ | १,०७,४९,९३२ | ९९,७९,७७६ | ८९० | २,०७,३०,५९८ |
| ५ | ५०-५९ | ७८,५४,०५२ | ७७,५६,४०८ | ३३४ | १,५६,१०,७९४ |
| ६ | ६०-६९ | ५०,७२,३६२ | ४८,४६,०२५ | १३३ | ९९,१८,५२० |
| ७ | ७०-७९ | २६,३६,३४५ | २७,१६,४२४ | ६३ | ५३,५२,८३२ |
| ८ | ८०-८९ | ९,१५,७९८ | ११,१८,१४७ | १३ | २०,३३,९५८ |
| ९ | ८५-१५० | ५,४२,८९१ | ६,९८,०२२ | ०६ | १२,४०,९१९ |
| १० | १००-१५० | २१,०८९ | २६,२९८ | ०२ | ४७,३८९ |

**३. मतदान केंद्रे :-**

| अ.क्र. | मतदान केंद्राचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | शहरी मतदान केंद्र | ४२,६०४ |
| २. | ग्रामीण मतदान केंद्र | ५७,५८२ |
| | एकूण मतदान केंद्रे | १,००,१८६ |

शहरी भागातील मतदारांची अनस्था विचारात घेऊन शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे यासाठी राज्यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे, इ. शहरांमध्ये अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुले यामध्ये एकूण १,१८१ मतदान केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. तसेच झोपडपट्टी भागात २१० मतदान केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. तसेच सहाय्यक मतदान केंद्रांची यादी सोबत जोडली आहे. सहाय्यक मतदान केंद्रांचे एकूण संख्या २४१ इतकी आहे. याबाबतचा जिल्हानिहाय तपशील सोबत जोडण्यात आला आहे.

४. EVM-VVPAT :-

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १,००,१८६ इतक्या मतदान केंद्रांसाठी २,२१,६०० बॅलेट युनिट (२२१ %), १,२१,८८६ कंट्रोल युनिट (१२२ %) व १,३२,०९४ व्हीव्हीपॅट (१३२ %) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्स पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरीता त्यापैकी ५१६६ बॅलेट युनिट, ५१६६ कंट्रोल युनिट व ५१६५ व्हीव्हीपॅट इतक्या मशिन्सचा वापर करण्यात आला आहे.

या सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ दिनांक १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत सर्व जिल्हयांकडून करण्यात आलेली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २८८ विधानसभा मतदारसंघात खालीलप्रमाणे बॅलेट युनिट लागणार आहेत.

| विधानसभा मतदारसंघाची संख्या | आवश्यक बॅलेट युनिट |
|---|---|
| १८५ | १ |
| १०० | २ |
| ३ | ३ |

राज्यामध्ये विधानसभा निवडणूकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम उपलब्ध असून पुरेसा साठा राज्यामध्ये आहे.

५. विधानसभा निवडणूकीसाठी Observer (निरिक्षक):-

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्यातील २८८ विधानसभा मतदार संघासाठी १४२ सामान्य निरीक्षक (General Observer), ४१ पोलीस निरीक्षक (Police Observer) व ७१ खर्च निरीक्षक (Expenditure Observer) यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच खालील प्रमाणे विशेष पोलीस निरीक्षक, विशेष खर्च निरीक्षक व विशेष सामान्य निरीक्षक यांची नियुक्ती केलेली आहे.**

१. श्री. दिपक मिश्रा, भापोसे. (से. नि.) -विशेष पोलीस निरीक्षक.
२. श्री. बी. आर. बालकृष्णन, (Ex. IRS) -विशेष खर्च निरीक्षक.
३. श्री. मोहन मिश्रा, भाप्रसे (से. नि.) -विशेष सामान्य निरीक्षक.

६. **Law and Order (कायदा व सुव्यवस्था):-** दिनांक ०४.११.२०२४ पर्यंतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्यातील वितरीत केलेले एकूण शस्त्र परवाने | ७८,२६७ |
| २. | जमा करण्यात आलेली शस्त्रास्त्रे | ५५,१३६ |
| ३. | जप्त करण्यात आलेली शस्त्रे | २२९ |

| | | |
|---|---|---|
| ४. | परवाने रद्द करून जप्त करण्यात आलेली शस्त्रे | ५७५ |
| ५. | परवाना जमा करण्यापासून सुट देण्यात आलेली शस्त्रे | १०,६०३ |
| ६. | जप्त करण्यात आलेली अवैध शस्त्रास्त्रे | १,२९४ |
| ७. | राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून BNSS कायद्यांतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई केलेल्या इसमांची संख्या | ४६,६३० |

**७. राज्यभर अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या जप्तीची माहिती :-**

राज्यामध्ये दि. १५.१०.२०२४ ते दि. ०४.११.२०२४ या कालावधीत राज्यातील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारु, ड्रग्ज व मौल्यवान धातु इ. बाबींच्या जप्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जप्तीची बाब | परिमाण | रक्कम (कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | रोख रक्कम | - | ६३.४७ |
| २ | दारु | ३४,८९,०८८ लिटर | ३३.७३ |
| ३ | ड्रग्ज | ३८,२४,४२२ ग्राम | ३२.६७ |
| ४ | मौल्यवान धातू | १४,२८,९८३ ग्राम | ८३.१२ |
| ५ | फ्रिबीज | ३४,६३४ (संख्या) | २.७९ |
| ६ | इतर | ८,७९,९१३ (संख्या) | ३६.६२ |
| | एकुण | - | २५२.४२ |

८) दि. १५.१०.२०२४ ते ०४.११.२०२४ या कालावधीत राज्यभरात C-Vigil app वर आचारसंहिता भंगाबाबतच्या २,४६९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील २,४५२ (९९.३१%) तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आज अखेर NGSP Portal वरील ७,७९३ तक्रारीपैकी ५,२०५ निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

**९) माध्यम देखरेख व संनियत्रण समिती** (PRE CERTIFICATION/ APPELLATE - MCMC) :-

राजकीय पक्षामार्फत प्रचार प्रसिध्दीकरिता इलेक्ट्रॉनिक माध्यमांमार्फत दिल्या जाणाऱ्या जाहिरातीचे ऑडियो-व्हिडियो/ संदेश यांचे पुर्व प्रमाणिकरण करण्यासाठी राज्यस्तरीय माध्यम प्रमाणिकरण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीकडे जाहिरातीच्या PRE CERTIFICATION साठी नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने ९० प्रमाणपत्राद्वारे ६२८ जाहिरातींना मान्यता देण्यात आलेली आहे.

...........